# BDC LIBRARY

## New Paper Clipping

*A.Y. 2024-2025*



**पाटण : जमिला मुलाणी यांना कोयनारत्न पुरस्कार प्रदान करताना डॉ. शिरीषकुमार पवार, ॲड. बाबुराव शेळके, डॉ. हेमलता काटे, उस्मान मुलाणी, मदिना मुलाणी व इतर.**

# जमिला मुलाणी 'कोयनारत्न' पुरस्काराने सन्मानित

**पाटण :** कोयना एज्युकेशन सोसायटी व माजी विद्यार्थी संघातर्फे कराड पंचायत समितीच्या शिक्षण विस्तार अधिकारी जमिला मुलाणी यांना कोयना रत्न पुरस्काराने गौरविण्यात आले. शिक्षण क्षेत्रात दिलेल्या भरीव योगदानाची दखल घेऊन त्यांची पुरस्कारासाठी निवड करण्यात आली आहे. येथील बाळासाहेब देसाई कॉलेजमध्ये माजी विद्यार्थी स्नेहमेळाव्यात जमिला मुलाणी यांना पुरस्कार प्रदान करण्यात आला. कार्यक्रमास माजी मुख्याध्यापक उस्मान मुलाणी, माजी मुख्याध्यापिका मदिना मुलाणी, प्राचार्य डॉ.शिरीषकुमार पवार, डॉ.हेमलता काटे, प्रा.डॉ.विलासराव कळंत्रे, प्रा.डॉ.पांडुरंग ऐवळे, संघाचे अध्यक्ष ॲड.बाबुराव शेळके यांच्यासह मान्यवर उपस्थित होते. जमिला मुलाणी म्हणाल्या, आई -वडिलांचे संस्कार व शाळेने दिलेली ज्ञानाची शिदोरी यामुळेच जीवनात उत्तुंग यश प्राप्त करता आले. शाळेच्या विकासासाठी सदैव प्रयत्नशील राहीन. दरम्यान जमिला मुलाणी यांनी शाळेविषयी कृतज्ञता व्यक्त करत शाळेस २५ हजार रूपयांची देणगी दिली. यावेळी माजी विद्यार्थ्यांनी शालेय आठवणींना उजाळा दिला. कार्यक्रमास शिक्षक, विद्यार्थी उपस्थित होते.